## निशाणी क्र. ७१ वरील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्त करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

०२. अर्ज व प्रतिवादी यांनी अर्जास दिलेले म्हणणे वाचले.

०३. वादीतर्फे वकील श्री. कैलास पवार यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादी व वकील गैरहजर असता प्रतिवादी तर्फे अर्जास दिलेले म्हणणे युक्तीवाद म्हणून ग्राह्य धरण्यात येते.

०४. वादीचे कथन की, प्रस्तुत दाव्याने ते दावा मिळकतीचे मालक असल्याचे जाहीर होऊन व प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई हुकुम पारित करावा अशी मागणी केली. दावा प्रलंबित दरम्यान पावसाळयात घराची कौले शाकारीत असताना घरातील माळयावर पुरातन संदुक/पेटीमध्ये दावा मिळकतीबाबत सन १९४२, १९४८, १९५० व १९५१ रोजीचे मुळ नोंदणीकृत खरेदीखत सापडले असुन सदरचे खरेदीखत हे अभिलेखावर दाखल करण्यात आले आहे. सदर मिळकतीचे वादी हे मालक आहेत. परंतु, सदर खरेदीखताच्या अनुषंगाने दावा मिळकतीचे वर्णनामध्ये काही बदल करणे राहून गेलेले आहे. दावा परिच्छेद क्र.२ मधील मजकूर वगळून प्रस्तुत अर्जात परिच्छेद क्र.२व २अ, मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तूत अर्जात दावा मिळकतीचे वर्णन समाविष्ट करणे गरजेचे आहे. वादीचे कथन की, प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे मूळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही व प्रतिवादीच्या बचावास कोणतीही बाधा येणार नाही. सबब, न्याहितास्तव अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली.

०५. याउलट प्रतिवादींचे युक्तीवाद की, प्रस्तुत अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दावा मिळकती व दाव्याचे मुळ स्वरुप बदल होणार आहे. वादीतर्फे पुराव्याचे शपथपत्र दाखल करण्यात आले. वादी हे डयु डिलीजेनट नाही. प्रस्तावित दुरुस्तीला झालेला विलंबाबाबत वादीने कोणतीही समाधानकाराक कारण दिलेले नाही. परिणामी अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ च्या तरतुदी अन्वये चालण्यास पात्र नाही. सबब, फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

०६. उभयपक्षांतर्फे करण्यात आलेल्या परस्पर विरोधी युक्तीवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुत दाव्याने वादीने ते दावा मिळकतीचे मालक असल्याचे जाहीर होऊन व प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई हुकुम पारित करावा अशी मागणी केली. तर प्रस्तावित दुरुस्तीने वादी दावा मिळकत म्हणून इतर मिळकती जसे की, स.नं.२८/३न (जुना नं.२८/६), ८५/५ड (जुना नं.२५/५), ७/७अ (जुना पर्डी ७अ), ७/७ज्ञ, १२८/२ व ४/३ब या मिळकती समाविष्ट करण्याची परवानगी मागितली. वादीचे कथन कथन की, दावा प्रलंबित दरम्यान अलिकडेच त्याने पावसाळयात घराची कौले शाकारीत असताना घरातील माळयावर पुरातन संदुक/पेटीमध्ये उपरोक्त मिळकतीबाबतचे सन १९४२, १९४८ व १९४९ चे मुळ नोंदणकृत खरेदीखत सापडले. सदर दस्ताच्या अनुषंगाने वादी हे दावा मिळकती त्यांच्या मालकीचे असल्याचे सांगून दावा दुरुस्त करु पाहत असल्याचे दिसुन येते. वादी तर्फे प्रस्तावित दुरुस्तकरिता दिलेले कारण हे सकृतदर्शनी वाजवी दिसुन येते. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नसल्याचे दिसुन येते. प्रस्तावित दुरुस्तीमुळे उभयपक्षांतील वादाचे एकाच दाव्यामध्ये निराकार होणार आहे व नवीन दावे टाळता येणार आहे. दाव्यात जरी वादीतर्फे पुराव्याचे शपथपत्र

दाखल केले असलेतरी प्रतिवादीतर्फे वादी साक्षीदाराचा उलटतपास घेणेबाकी आहे. दाव्याचा टप्पा लक्षात घेता प्रस्तावित दुरुस्तीला कायदेशीर प्रक्रियेची बाधा येत नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. प्रतिवादींच्या बचावास कोणतीही बाधा निर्माण होणार नसल्याचे स्पष्ट होते. याउलट वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये मधील सर्व वाद मिळकतीचे एकाच दाव्यात निराकारण होऊन भविष्यात उद्भवणारे दावे टाळता येणार आहे. सदर बाबी लक्षात घेता प्रतिवादी तर्फे अर्जास वर परिच्छेद क्र.०५मध्ये घेतलेल्या हरकती या खारीज कारण्यात येते. सबब, चर्चील्या बाबी लक्षात घेता प्रस्तुतचा अर्ज हा न्यायहितास्तव मंजूर होणेस पात्र ठरतो असा निष्कर्ष नोंदवून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींना रुपये ५००/- खर्च देण्याच्या अटीवर वादीस मागणीप्रमाणे मुळ दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

**सही/-**

महाड
दिनांक १०/०१/२०२४

(**पी. एम. उन्हाळे**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड